# प्रजासत्ताक दिनी संविधानाचा जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्याप्रीत्यर्थ संविधान अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. यानुषंगाने सामाजिक न्याय विभागाच्या वतीने 'घर घर संविधान' उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रजासत्ताक दिनी प्रास्ताविकेचे वाचन करण्यात येणार असून प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी भारतीय संविधानाबद्दल माहिती देणारे कार्यक्रम व संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाटप पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

नागपूर जिल्ह्यात सामाजिक न्याय विभागामार्फत २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात भारतीय संविधानावर आधारित १२ फूट रुंदीचा व ४० फूट लांबीचा चित्ररथ तयार करण्यात आला असून कस्तुरचंद पार्क, नागपूर येथून पालकमंत्री यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून चित्ररथाची सुरुवात होणार आहे. चित्ररथाच्या माध्यमातून समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रचार व प्रसिद्धी करून जनजागृती करण्यात येणार आहे. असे आवाहन समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाबासाहेब देशमुख यांनी कळविले आहे.